Impact Factor 6.261 ISSN-23 [illegible]

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary International E-research

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol-(II)

12 January 2018 Special Issue

# महिला सबलीकरणाच्या समस्या आव्हाने आणि उपाय



Chief Editor,
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This Issue
Prof. A.R. Bhosle
Assist. Prof. Head of Dept. Sociology
Vasant Mahavidalaya, Kaij, Dist. Beed

Dr. S.K. Gaike
Assist. Prof. Dept. of Sociology
Vasant Mahavidalaya, Kaij, Dist. Beed

| | | | |
|---|---|---|---|
| 39. | जागतिकिकरण आणि महिलांचे सबलीकरण | प्रा. विरभद्रेश्वर सामलिंग स्वामी | 106 |
| 40. | कौटुंबिक हिंसाचार कायदा–2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने | प्रा.डॉ. अन्सारी एस. जी. | 109 |
| 41. | नारीवादी अध्ययन तथा लेखन की आवश्यकता | डॉ.व्यास सी.पी. | 111 |
| 42. | कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या स्त्रिया आणि लिंगभाव विषमता | प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड | 113 |
| 43. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे. | 116 |
| 44. | मराठी स्त्रीवादी साहित्य, समाज आणि स्त्रिया | प्रा.डॉ. रामकिशन दहिफळे | 119 |
| 45. | महिलांमधील रोजगार योजने संदर्भातील जागरूकता आणि लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | डॉ. अनिता जिवतोडे (टेकाडे) | 121 |
| 46. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | श्री. बापू तुकाराम बाराते | 124 |
| 47. | साहित्य समाज आणि स्त्रिया | डॉ. जनार्दन काटकर | 126 |
| 48. | कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ आणि स्त्रियांपुढील आव्हान | डॉ. रेखा एम. शेरकर | 129 |
| 49. | परित्यक्ता स्त्रियांचे प्रश्न | प्रा.डॉ.संतोष देशमुख | 132 |
| 50. | भारतीय समाज व्यवस्थेला लागलेली किडः हुंडा प्रथा | प्रा.बोराडे तानाजी रामभाऊ | 134 |
| | कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने –एक समजाशास्त्रीय अभ्यास | डॉ. गायके एस.के., कांबळे एम.एस. | 136 |
| 51. | कौटुंबीक हिंसाचार व स्त्रिया | कांबळे दलित सुभाषराव | 140 |
| 52. | कौटुंबिक हिंसाचार कायदा–2005 आणि आव्हाणे | डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे | 142 |
| 53. | मध्यम वर्गीय स्त्रियांपुढील आव्हाने | प्रा. कोल्हे टी. टी. | 143 |
| 54. | महिला चळवळ आणि स्त्रिया | प्रा.डॉ. विजय दि. पोकळे | 146 |
| 55. | महिला चळवळ आणि स्त्रिया | डॉ. यादव पोडके | 149 |
| 56. | मैत्रेयी पुष्पा के साहित्य में स्त्री और समाज | प्रा.श्रीमती पोटकुले हिरा | 151 |
| 57. | भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रिया आणि हुंडा प्रथा | भिमराव मोटे | 153 |
| 58. | भारतीय महिलांसमोरील समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. परळकर शशिकांत दत्तोपंत | 154 |
| 59. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा.डॉ. आचार्य आर. डी. | 156 |
| 60. | महिला चळवळ आणि समाजसुधारकांचे योगदान | प्रा.डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव | 158 |
| 61. | स्त्रीवादी अभ्यास, विकास आणि स्त्रीया | प्रा. गोदावरी व्ही. बन | 161 |
| 62. | भारतीय स्त्रि.विषयक कायद्याची वास्तविकता.विश्लेषत्मक अध्ययन | प्रा.सिताराम कचरु मोगल | 164 |
| 63. | वैश्विक लैंगिक अंतराल में भारत की स्थिति का अध्ययन | प्रा. छाया एस. तोटवाड, प्रा. डॉ. सुर्यकांत टि. पवार | 167 |
| 64. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा.सोनटक्के रमेश शंकरराव | 169 |
| 65. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा. सुलभा बब्रुवान सोळंके | 172 |
| 66. | स्त्री विरोधी हिंसा- कारणे व उपाय | प्रा.डॉ.बी.एन.कावळे | 174 |
| 67. | लिंगभाव असमानता आणि बांधकाम क्षेत्रातील स्त्रियांच्या समस्या | प्रा. भोसले एस. | 176 |


S.P.Mahavidyalaya,Bhoom • Tq.Bhoom Dist.O.bad • Bhoom

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) -0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue -92 , महिला सबलीकरणाच्या समस्या । आव्हाने आणि उपाय

# भारतीय समाज व्यवस्थेला लागलेली किडः हुंडा प्रथा

प्रा.बोराडे तानाजी रामभाऊ
शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

---

प्रस्तावना

समाजात जीवन जगत असताना अनेक व्यक्तींचा संबंध येत असतो. जीवन जगण्यासाठी अनेक प्रकारच्या आंतरक्रिया घडुन येत असतात व त्यातुनच मानवी जीवनाची पूर्ती होत असते.

जेव्हा समाज संघटीत असतो तेव्हा एकमेकांशी असणारे संबंधसुध्दा सुसंघटीत असतात. तर कधी कधी समाजातील लोकांचे संबध हे विघटीत करणारे असु शकतात. मानवी गरजांच्या पूर्तीमधुनच मानवामध्ये स्वार्थभावना तयार झाली व यातुनच मुलीकडून काही न काही घेण्याची प्रथा सुरु झाली. सुरुवातीला पालक स्वःखुशीने काही भेटवस्तु दागीने व संसार उपयोगी साहीत्य देत पण पुढे याचे रूपांतर प्रथेत झाले व यातुनच ''हुंडा प्रथा'' समाजात सुरु झाली व आज या प्रथेने समाजात अस्थिरता निर्माण केली आहे व यातुनच 'मुलगी नको' 'मुलगाच हवा' ही भावना लोकात वाढली यातुन 'स्त्री भ्रुण हत्या' सुरू झाल्या आहेत.

हुंडा पद्धती ही स्त्रियांच्या संदर्भातील एक अत्यंत ज्वलंत समस्या आहे. या समस्येचे स्त्रीयावर तसेच विवाह संस्था, कुटुंबसंस्था आणि एकुणच भारतीय समाजावर गंभीर असे दुष्परिणाम होत आहेत.

हुंडा देणे–घेणे कायद्याने गुन्हा आहे मुलाने मुली कडुन किंवा मुलीन मुलांकडनू परस्पराची किंमत ठरवून केलेला हा व्यवहार असतो. मुलगी शिकलेली असो किंवा नसो, लग्न ठरविताना तिच्या सोबत किती पैसे वा सोने वरदक्षिणा म्हणून द्यायचे हे आधि निश्चित केले जाते. ज्या मुलाला मुलगी मिळत नाही तेव्हा त्याचे माता–पिता मुलीकडील लोकांना काही रक्कम देवून मुलगी आणतात याला वधुमूल्य किंवा कन्यामुल्य असे म्हटले जाते अशा घटना अपवादात्मक घडत असतात.

भारतात हुंडयासाठी कोणताही धर्म, पंथ आणि जात अपवाद नाही. सर्वच समाजात ही पद्धत अंगीकारली आहे. म्हणजेच भारतातील कोणत्याच मुला मुलीचे विवाह हुंड्या शिवाय होत नाहीत. मुलगा सुशिक्षीत असो किंवा अशिक्षीत, गरीब असो वा श्रीमंत हुंडा म्हणजे हुंडाच. हुंड्याशिवाय बाकी काही नाही.

मुलगी सुंदर असो किंवा कुरूप हुंडा द्यावाच लागतो. मुलगी सुशिक्षीत असेल तर हुंडा कमी द्यावा लागतो हा समज आज चुकीचा ठरला आहे. एवढेच नाही तर कमावती (नोकरी करणारी स्त्री) असेल तरीही तिचा सुन–पत्नी म्हणून स्वीकार केला जात नाही. म्हणजे या प्रथेला समाजाने मान्यता दिलेली आहे. व या प्रथेचे वेगवेगळया कारणाने समर्थन केले आहे. हुंडा कशाला म्हणायचे या संदर्भात काही विचारवंतानी खालील व्याख्याद्वारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

''हुंडा म्हणजे विवाहाच्या वेळी वराला त्याच्या पत्नी कडून किंवा तिच्या नातलगाकडून मिळणारी मालमत्ता ज्यात पैसा सोने चांदी व जमीन इचा समावेश झालेला असतो''[1]

हुंडा म्हणजे एका पक्षाने लग्नापुर्वी किंवा लग्नानंतर दिलेली किंवा होण्याची मान्य केलेली कोणतीही मालमत्ता व मौल्यवान वस्तु होय असे 1961 च्या हुंडा प्रतिबंधक कायद्यात स्पष्ट करण्यात आले आहे.''[2]

मॅक्स रॅडीयन–''साधारणपणे एखाद्या पुरूषास त्याच्या विवाहाच्या वेळी त्याच्या पत्नीकडून किंवा पत्नीच्या कुटुंबाकडुन मिळणारी संपत्ती म्हणजे हुंडा होय.''[3]

फेअरचाईल्ड–''हुंडा म्हणजे अशी संपत्ती की जी वधुच्या आई–वडीलाकडून किंवा जवळच्या नातेवाईकाकडून वरास दिली जाते''[4]

हुंडा प्रथा ही समाजात कशी सुरू झाली यासंदर्भात खालील कारणांचा परामर्श घ्यावा लागतो.

**कारणे**

1. **धार्मिक कारण**– पुर्वीच्या काळात गृहस्थ त्याच्या कन्येचे विवाहाप्रसंगी सालंकृत दान करत असे. त्यास कन्यादान म्हणत असे कन्यादान करणे गृहस्थाचे धार्मिक कर्तव्य मानले जात असत. यातुनच कन्यादानाची प्रथा समाजात सुरू झाली. तसेच वधु बरोबर काही रक्कम, भेट वस्तु देणे रूढ झाले व यातुनच वराची व त्याच्या आई–वडीलाची लालसा वाढत गेली व तिचे रूपांतर पुढे हुंड्यात झाले.

2. **स्त्री धनाची कल्पना**– विवाहानंतर कन्येचे तिच्या पतीगृही भावी आयुष्य सुखकारक व्हावे. काही अडचण आल्यास आर्थिक मदत व्हावी. म्हणून पिता तिला काही रक्कम देवु लागला. महाभारतात व्यास म्हणतात की स्त्रीने प्रसन्न चिताने पतीगृही जाण्यास प्रेरक ठरणारे धन होय. यावर स्त्रीची मालकी असे. काळाच्या ओघात याचे रूपांतर या पद्धतीत झाले.

3. **आंतर विवाह नियम**– स्वतःच्या जातीतच विवाह करण्याची सक्ती परंपरेने चालु आहे ही सक्ती धर्माचा आधार म्हणून केली जाते. बाहेरच्या धर्मात मुलगी देणे ~~यास~~ धार्मिक विरोध असतो. व यातुनच स्वतःच्या जातीतील व धर्मातील वर मिळवण्यासाठी स्पर्धा सुरू झाली व हुंडा प्रथेला चालना मिळाली.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) -0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue -92 , महिला सबलीकरणाच्या समस्या : आव्हाने आणि उपाय

4. **विवाहाची अनिवार्यता**– स्त्रीसाठी संसाराच्या माध्यमातुन विवाह अनिवार्य आहे. स्त्रीसाठी हिंदु धर्मात एक संस्कार मानला आहे. व त्यामुळे तिच्या आयुष्याला मर्यादा आली. लग्न केले नाही, तर पाप लागते व मुलीच्या शिलाचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे विशिष्ट वयात विवाह करणे प्रतिष्ठेचे समजले जावू लागले.

5. **जाती व्यवस्था**– आपल्या जीवनाचा जोडीदार आपल्या जातीतुनच निवडावा असा जातीचा व धर्माचा दंडक होता. त्यामुळे विवाहाचे क्षेत्र लहान बनत गेले व वधुपिता स्वजातीतुन वर निवडताना हे हुंड्याचे अमीष दाखवू लागला व यातुन वर पक्ष जास्तीत–जास्त हुंडा मागु लागला.

6. **कुलीन विवाह**– हिंदु समाजात मुलीचा विवाह आपल्या पेक्षा उच्च कुळातील मुलाशी व्हावी. यातुन या प्रथेला चालना मिळाली.

7. **अनुकरण** सुरूवातीला राजे–राजवाडे, सरदार, जाहागीरदार श्रीमंत लोक आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यासाठी व मुलीचे वैवाहीक जीवन सुखी व्हावे म्हणून वरपक्षास संपत्ती देवू लागला व पुढे सर्व समाजाने याचे अनुकरण करण्यास सुरूवात केली.

8. **सुयोग्य स्थळाची अपेक्षा**– आपल्या कन्येस सुखरूप तसेच सुशिक्षीत, चांगले उत्पन्न असलेला वर मिळावा. तिचे सासर खावुन–पिवुन सुखी समाधानी असावे. खर्चा–पाण्याची चण–चण भासु नये. यातुनच मुलगा जेवढा श्रीमंत, उच्च शिक्षीत तेवढा हुंडा जास्त असे समीकरण बनले.

9. **सामाजिक प्रतिष्ठा**–भारतात आज हुंडा जास्त प्रमाणात देणे व घेणे आली कडील काळात प्रतिष्ठेचे लक्षण समजले जावु लागले आहे व आपली सा.प्रतिष्ठा उंचावण्यासाठी हुंडा देवू–घेवू लागले.

10. **भरपाईचे तत्व**– मुलीच्या लग्नात दिलेल्या हुंड्याची रक्कम ही मुलाच्या लग्नात वसुल व्हावी अशी अपेक्षा मुलाचे पालक करत असत. तसेच मुलगा सुशिक्षीत चांगली नोकरी व्यवसाय करणारा असेल तर त्याच्या शिक्षणासाठी झालेला खर्च वसुल व्हावा ही अपेक्षा वराचे पिता करू लागले.

11. **पितृसत्ताक व्यवस्था**– स्त्रीयांच्या सर्व समस्यांचे मुळ हे ह्या व्यवस्थेत आहे. पितृसत्ताक समाज व्यवस्था व संस्कृती हे पुरुक्षापेक्षा स्त्रीयांचे स्थान व दर्जा कनिष्ठ मानल्या गेल्याने आपले श्रेष्ठतव सिध्द करण्यासाठी वधु पक्षाकडे हुंड्याची मागणी केली जाते.

12. **मुलींची कुरूपता**–जर मुलगी कुरूप, अपंग असेल तर तिच्या आईवडीलासाठी तिचा विवाह करणे अवघड असतो. अशा मुलीशी विवाह करण्यास सहसा कोणताही मुलगा तयार होत नाही अशा मुलीचे पालक जास्त हुंडा देवुन तिचा विवाह करून देण्यास तयार असतात.

## परिणाम

विवाह जुळवताना वधु–वर पक्ष आर्थिक वाटा–वाटी करत असतो. या पवित्र संस्कारास बाजारी स्वरूप प्राप्त झाले आहे. यातुन ऐकमेकात द्वेष निर्माण होतो. व विवाहाचे पावित्र्य भंग पावते. तसेच वधु कुटुंब हे विवाहामुळे उध्वस्त होत असते. विवाहाच्या वेळी केलेला खर्च ऐपतीपेक्षा जास्त असल्याने आर्थिक दिवाळखारीत निपतो. कधी कधी त्याला जमीन गुरे विकावी लागतात.

काही वेळेस पैसा उपलब्ध होत नसल्यास वाममार्गाचा अवलंब करून तो उभारला जातो व यातुन गुन्हेगारीस प्रोत्साहन मिळते. आज अनेक मुलींचा या हुंड्यापायी जीव घेतला जात आहे तर कधी स्वतःहुन मुली आत्महत्या करू लागल्यात यातुनच आज पुढील अनर्थ टाळण्यासाठी मुलीचा जन्म नाकारण्यासाठी प्रवृत्ती वाढीस लागली आहे व यातुन स्त्री–पुरूष प्रमाण विषम होवु लागले आहे व अनेक मुलांवरती ब्रम्हचारी राहण्याची वेळ येवु पाहत आहे. तसेच अनेक मुलींना पसंत नसलेल्या व वयात अंतर असलेल्या मुलाशी विवाह करावा लागतो. तसेच यातुन बालविवाह, घटस्फोट, परित्याग, आत्महत्येचे प्रमाण आज फार वाढले आहे.

## उपाय योजना

हुंडा प्रथा नष्ठ करण्यासाठी सरकारने 1961 मध्ये कायदा करून हुंडा देणे घेणे गुन्हा ठरवला आहे तसेच प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीस 15,000रू दंड व 5 वर्ष कैद अशी शिक्षा आहे.

भारतीय दंड संहीत कलम 304 नुसार जर विवाहानंतर मुलीच्या हुंड्यासाठी 60 रू होत असेल तर 7 वर्ष कारावासाची शिक्षा होवू शकते. हे कायदे असूनही त्यात अनेक उणिवा असल्यामुळे व कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसल्याने लोकांवरती कायद्याचा वचक नाही. याची योग्य अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तरच ही प्रथा समाजातुन नष्ठ होवु शकणार नाही.

## संदर्भ सुची

1. ग्रामीण प्रश्न समस्या दा.धो.काचोळे पृ.क्र.21
2. भारतातील धर्म लोकसंख्या दा.धो.काचोळे पृ.क्र.27
3. लोकसंख्या आणि समाज दा.धो.काचोळे पृ.क्र.23
4. ग्रामीण भारताच्या समस्या दा.धो.काचोळे पृ.क्र.[illegible]

S.P. Mahavidyalaya, Bhoom BHOOM Tq. Bhoom Dist. Osmanabad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya, Bhoom
Dist.Osmanabad